| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 195 | डॉ. अर्चना जगतकर (कांबळे) | पर्यावरण संवर्धनातील स्त्रियांची भूमिका : विशेष संदर्भ 'प्रयत्नांती पर्यावरण ग्रुप' एक व्यष्टी अध्ययन | 716 To 718 |
| 196 | प्रा. डॉ. अर्जुन उबाळे | पंचायत राज आणि महिलांचा राजकीय सहभाग | 719 To 721 |
| 197 | प्रा. अरूण सदाशिव कटकोळे | आझाद हिंद सेनेतील रणरागिनी कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन | 722 To 724 |
| 198 | प्रा. कॅप्टन अरविंद मारूती चौगले | सामाजिक शास्त्रातील तुलनात्मक अभ्यास | 725 To 728 |
| 199 | भगवंत भिमराव पाटील<br>डॉ. आनंद एम. पाटील | इयत्ता १० वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांच्यामध्ये ई-लर्निंगच्या सहाय्याने इतिहास विषयाच्या संपादणूकीमध्ये होणारी वाढ- चिकित्सक अभ्यास | 729 To 733 |
| 200 | बाळासाहेब बजरंग सरगर | भारतासमोरील चीनच्या आव्हानांचे व्यवस्थापन | 734 To 735 |
| 201 | बळवंतराव कुंडलिक जाधव | शेतकरी चळवळ एक आव्हान | 736 To739 |
| 202 | भीमराव हाटकर | महाराष्ट्रातील आरक्षणाचे तिढे आणि विविध जातीसमुहांचे लढे : समस्या आणि उपाय | 740 To746 |
| 203 | डी. एस. क्षीरसागर | भारतातील मॉब लिंचिंग समस्येचे राजकीय विश्लेषण | 747 To 751 |
| 204 | दत्ता बाबुराव जाधव | मराठवाडयाच्या महसुल प्रशासनातील नाविण्यपूर्ण उपक्रम | 752 To 754 |
| 205 | डॉ. रावसाहेब केराप्पा शेळके | राजर्षी शाहू महाराजांचे प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ चा अभ्यास | 755 To 758 |
| 206 | डॉ. तानाजी रामचंद्र हवलदार | बत्तीस शिराळयाचा नागपंचमी उत्सव : गैरसमज व पर्यावरणवाद्यांची भूमिका | 759 To 761 |
| 207 | गणेश गंगाधर शिंदे | दहशतवाद– एक जागतिक समस्या | 762 To 763 |
| 208 | गौतमी कांबळे | महाराष्ट्रातील सामाजिक स्त्री मुक्तीची चळवळ | 764 To 766 |
| 209 | जयकुमार चंदनशिवे | स्त्रीवादी चळवळ आणि विचारसरणी | 767 To 770 |
| 210 | ज्योती रमेश कांबळे | जम्मू–काश्मिरचा विशेष दर्जा आणि कलम ३५ अ | 771 To 774 |
| 211 | Dr.N.B.Khot<br>Jubeda U.Mulla | पुरातत्व विद्या – एक अभ्यास शाखा | 775 To 778 |
| 212 | माधव सोपानराव कदम | ध्वनीमुद्राकाचा विद्यार्थ्यांच्या खेळाविषयी आवड, सहभागावर होणारा परिणाम | 779 To 780 |
| 213 | डॉ. करीम नबी मुल्ला | औंध लोकशाही प्रतिमानाची समकालीन प्रस्तुतता | 781 To 785 |
| 214 | डॉ. खंडेराव ज्ञानदेव खळदकर | वर्तमान भारतातील उत्तमशासन कारभारासमोरील आव्हाने | 786 To 790 |
| 215 | वाल्मीक भीमराव किर्तीकर | भारतातील निवडनूक प्रकिया निवडणूक आयोगाची भूमिका आणि घटनात्मक तरतुद | 791 To 795 |





Scanned with CamScanner

# औंध लोकशाही प्रतिमानाची समकालीन प्रस्तुतता

डॉ. करीम नबी मुल्ला
राज्यशास्त्र विभाग,
श्री. आर. आर. पाटील कॉलेज, सावळज, ता.तासगांव,जि. सांगली

## प्रस्तावना

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारतात संस्थानी राज्यव्यवस्था होती. भारतात अनेक लहान–मोठी संस्थाने होती. औंध हे सातारा जिल्ह्यातील एक संस्थान होते. विसाव्या शतकातील औंध संस्थानचे प्रमुख भवानराव उर्फ बाळासाहेब पंतप्रतिनिधी पुरोगामी विचारांचे होते. बाळासाहेब पंतप्रतिनिधी ८ नोव्हेंबर १९०९ मध्ये सत्तेवर आले. त्यांच्या पुरोगामी धोरणामुळे औंध परिसराचा राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास झाला. लोकसत्ताक राज्यपध्दतीचा प्रयोग, औंधने भारताला दिलेली प्रत्यक्ष प्रायोगिक देणगी आहे. महात्मा गांधीच्या ग्रामोध्दार, स्वदेशी, अहिंसा, साक्षरता,पंचायत राज आदी राजकीय विचारांचा प्रभाव या प्रयोगावर पडलेला होता. या लोकशाहीच्या प्रयोगामुळे औंध ची ख्याती भारतभर झाली. प्रस्तुत शोधनिबंधात औंधच्या लोकशाही प्रतिमानाची समकालीन प्रस्तुतता, त्याचे महत्त्व राज्यशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यासले आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील संस्थानीराज्यासमोरील आव्हाने, आणि ती आव्हाने सोडविण्यासाठी तत्कालीन राज्यकर्त्यांनी केलेले प्रयत्न कसे महत्त्वाचे आहेत, कसे महत्त्वाचे आहेत हे अभ्यासले आहे. स्वतंत्र भारतातील सरकारांनी राबविलेल्या अनेक योजनांची बीजे औंध प्रतिमानात दिसून येतात. यावरुन याचे महत्त्व स्पष्ट करता येते. ग्रामस्वच्छता अभियान, तंटामुक्त गाव योजना, लोक अदालत, ग्रामसभांना विशेष अधिकार आदी योजना उदाहरणादाखल देता येतात. आजचा समाज भौतिक यशाची शेखी मानणारा असला तरी, त्यावेळी औंधमधील बहात्तर गावातून साकार झालेल्या या ग्रामराज्याच्या प्रयोगाने तत्कालीन समाजजीवनावर एक उदात्त राजकीय संस्कार घडविला गेला, हे नाकारता येत नाही. औंधने राबविलेले लोकशाहीचे प्रतिमान आजच्या लोकशाही प्रतिमानासारखे तंतोतंत नसले तरी त्या दृष्टीने वाटचाल करण्याच्या उद्देशाने त्याची स्थापना केल्याचे दिसून येते, किंबहूना एक राजा आपल्या राज्यसत्तेचा, मोठेपणाचा त्याग करुन सर्व सत्ता लोकांच्या हातात देऊन ती प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न करत होता. याच अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधात बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी राबविलेल्या या लोकशाही प्रतिमानाची उद्दिष्टे, राज्यघटना व त्याचे राजकीय विकासाच्या दृष्टीने महत्त्व इ. घटक अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे. शोधनिबंधाची मांडणी ऐतिहासिक व राजकीय दृष्टीकोणातून विश्लेषणात्मक पध्दतीने केली आहे. प्रस्तुत शोधनिबंधासाठी संस्थानकालीन कागदपत्रे, जाहिरनामे, गॅझेट तसेच तत्कालीन वर्तमानपत्रे प्रकाशित ग्रंथ, लेख आदी प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेतला आहे.

## सत्ता विकेंद्रीकरणाची पार्श्वभूमी

बाळासाहेब पंतप्रतिनिधी सन १९०९ मध्ये सत्तेवर आले. मिळालेल्या सत्तेचा वापर त्यांनी संस्थानातील राजकीय, आर्थिक, सामाजिक सुधारणांसाठी करायला सुरुवात केली. सन १९१६ मध्ये ग्रामपंचायत स्थापनेचा पहिला कायदा केला, तसेच विकेंद्रीकरण अधिक होऊन, लोकांचा सहभाग जास्त वाढावा म्हणून सन १९१९ मध्ये कायदा केला. या कायदयानुसार ग्रामपंचायतीमध्ये न्यायसभा, आरोग्यसभा, उद्योगसभा, शिक्षणसभा, सार्वजनिक कार्यसभा आदि सभा–समित्यांची निर्मिती करुन सत्तेचे अधिक सूक्ष्म विकेंद्रीकरण केले. बाळासाहेब पंतप्रतिनिधी एवढयावरच थांबले नाहीत, तर राजकीय विकासाच्या प्रक्रियेत समाज व राजकीय व्यवस्था अधिक आधुनिक असणे महत्त्वाचे असते याची जाणीव त्यांना होती. कारण त्यांनी परंपरागत सरंजामशाही राजकीय व्यवस्था क्रमाक्रमाने दूर करण्याचा प्रयत्न सातत्याने केलेला दिसून येतो. राजकीय विकासाच्या प्रक्रियेमध्ये समाजाची वाटचाल राजकीय विकासाच्या दिशेने होईल की, राजकीय ऱ्हासाच्या हे वाढत्या राजकीय सहभागाला सुसंगत अशा संस्थांची निर्मिती होण्यावर अवलंबून असते. त्यामुळे आधुनिक काळातील राज्यघटना, कायदेमंडळ, प्रशासन व्यवस्था, निवडणूका हे घटक खूप मोठया प्रमाणावर राजकीय विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. सार्वत्रिकदृष्ट्या विचार करता समाजातील श्रेष्ठीजन राजकीय विकासाला अनुकूल असतात असे नव्हे. धर्मगुरु, सरंजामदार, राजे असे



Scanned with CamScanner

समाजाच्या गरजा ओळखून, राजकीय व सामाजिक विचारप्रवाहाची दिशा जाणून औंधच्या राज्याने अनेक राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक धोरणे राबवून त्या परीसराचा विकास केला. तत्कालीन सामाजिक, आर्थिक घटकांची प्रतिकुलता विचारात घेता त्यांनी त्याकाळात राबविलेले हे प्रतिमान व त्याची प्रस्तुतता आजही कमी होत नाही. लोकशाही मुल्ये, मानवाधिकार, सामाजिक व सांस्कृतिक उद्धारण करून ते संवर्धित करण्याचा प्रयत्न आपणास प्रेरणा देणारा आहे. महात्मा गांधी यांनीही याचे कौतुक अनेकदा आपल्या लेखनांमधून केलेले आढळून येते. सन १९४० मध्ये पंडित नेहरु यांनी औंध येथे भेट देवून या सर्व उपक्रमांची पाहणी केली होती. एवढेच नव्हेतर औंध राज्यघटनेचा मसुदा स्वतंत्र भारताच्या राज्यघटना निर्मितीवेळी, घटनासमितीने त्याचे आवलोकन केल्याचे दिसून येते. यावरुन त्याची समकालीन प्रस्तुतता अधिकच ठळकपणे समोर येते. आधुनिक लोकशाही प्रतिमानाचे सर्व निकष वा मुल्ये त्यांनी राबविलेल्या लोकशाही प्रयोगात काही प्रमाणात जाणवत नसले तरी, वासाहातिक कालखंडात ब्रिटिश सत्तेच्या मताविरुध्द तसेच सरंजामशाहीचे राजकीय संस्कार असणाऱ्या घराण्यातला जन्म व सभोवतालची राजकीय, सामाजिक परिस्थिती ही लोकशाही विचाराला पुरक नसताना हा विचार मांडणे व कृतीत आणणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आजचे सत्ताप्राप्तीसाठीचे संघर्ष, स्पर्धा, हिंसा, दडपशाही, जातीयता आदि मार्गाचा होणारा सर्रास होणारा वापर पाहता बाळासाहेब पतप्रतिनिधी व त्यांच्या सहकार्यांनी मांडलेले हे लोकशाहीचे प्रतिमान आजच्या नेतृत्वाला, तरुणांना नवा आदर्श देणारे व प्रोत्साहीत करणारे आहेत. पारंपारिक अधिसत्ता मजबूत असताना स्वतःहून आधुनिक काळाशी जुळवून घेण्यासाठी त्यांनी लोकसत्ताक अधिसत्तेकडे केलेला प्रवास महत्त्वपुर्ण आहे. राज्यशास्त्रीय दृष्टीकोनातून त्याचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे दिसून येते.

## संदर्भ सूची


१. तुपे बी.यु., 'सोशो–इकॉनॉमिक स्टडी ऑफ औंध स्टेट (१८५४–१९४८)', अप्रकाशित पीएच.डी प्रबंध. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०००.

२. पटवर्धन वि. अ., 'संस्थानातील लोकशाहीचा लढा'.

३. औंध राज्यघटना कायदा– १९३९.

४. टेव्हरमुड इंदिरा, 'औंध इक्स्प्रीमेंट: ए गांधीयन ग्रासरुट डेमॉक्रसी, सोमय्या, पब्लीकेशन्स, मुंबई, १९८३.

५. चापेकर ना. गो., 'लोकसत्ताक औंध', औंध स्टेट प्रेस, १९४६.

६. शिरवे दा.न., (संपा.) 'गांधीविचार दर्शन', खंड–९, १९६१.

७. औंध ग्रामपंचायत कार्याचा अहवाल, सन १९४०.

८. पटवर्धन वि. अ., 'दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांच्या विलीनीकरणाची कथा'.

९. काळे गोपाळ नरहर, (संपा.) 'मराठी हरिजन', अंक – ७, १२ एप्रिल १९४२.

१०. गगराणी कविता, 'शिवाजी विद्यापीठ, इतिहास परिषद निवडक शोधनिबंध संग्रह', पत्रालेख, खुले कारागृह ते 'दो आँखे बारह हाथ' : एक अभ्यास', फेब्रुवारी २००९.

११. पंत अप्पा, 'मुलखावेगळा राजा', मान – सन्मान प्रकाशन पुणे, १९८९.

१२. दै. नवशक्ती, १९ ऑगस्ट १९४०.

१३. Austin Granville, 'The Indian constitutions-Corner Stone of Nation, Oxford University, Press, 1972.


TRUE COPY

Shri Balasaheb ... Patil
Ma... ...alaya, Sa... ... Sangli

Scanned with CamScanner